**संच : अ**

# शिक्षकांसाठी सूचना सहावी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७-१८

**इयत्ता - सहावी**

**विषय : मराठी**

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : ४०**

**प्रश्न १)** **शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट :** जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) वायफळ | २) मैदान |
| ३) सूर्यमाला | ४) कुऱ्हाड |
| ५) अन्नदान | ६) पत्रकार |
| ७) निबंध | ८) फॅशन |
| ९) शुभ्र | १०) पेट्रोल |

**गुणदान :** **प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**
हा प्रश्न तपासताना काही बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'मैदान' ऐवजी 'मयदान' किंवा 'निबंध' ऐवजी 'निबंद'/'निंबध' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४) हा उतारा वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न २)** भारत माझा देश आहे (गुण १)

**प्रश्न ३)** कारण कोणतीही वस्तू 'माझी' म्हटली की आपण तिची जितकी काळजी घेतो, तितकी 'आपली' म्हटल्यावर घेतोच असे नाही. (गुण २)
एका वाक्यास या वाक्यांपैकी कोणतीही दोन वाक्ये लिहिल्यास दोन गुण व एक गुण द्यावा. (स्वभाषेतील उत्तरे स्वीकारावीत.)

**प्रश्न ४)** **अ)** स्वच्छता ज्याचे घरी, आरोग्य तेथे वास करी! (गुण २)



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

## संच : अ

**प्रश्न ५ ते ७) ही कविता वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न ५)** **अ)** सळसळतात (गुण १)

**प्रश्न ६)** पुस्तकातून ज्ञान मिळते म्हणून किंवा (गुण २)

पुस्तकात रॉकेटचे तंत्र आहे. विज्ञान मंत्र आहे म्हणून

**प्रश्न ७)** स्वभाषेतील उत्तर स्वीकारावे. (गुण २)

**प्रश्न ८ ते १०) ही बातमी वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न ८)** १,३४१ रोपे (गुण १)

**प्रश्न ९)** **क)** पाटबंधारे विभाग (गुण २)

**प्रश्न १०)** निचरा होणारी जमीन आणि कमी पाऊस. (गुण २)

**प्रश्न ११ ते १५) खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव.** (गुण १०)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न ११)** नाम - सीमा, शाळा (गुण १)

वाक्य - सीमा बाजारात गेली/सीमा हुशार आहे. राम शाळेत गेला. (गुण १)

याप्रमाणे कोणत्याही योग्य वाक्यास १ गुण द्यावा.

**प्रश्न १२)** अब्दुल हुशार आहे.

**तो** रोज अभ्यास करतो.

**त्याने** सर्व स्पर्धांमध्ये बक्षिसे मिळविली. (गुण २)

(प्रत्येक बरोबर सर्वनामास एक गुण याप्रमाणे एकूण २ गुण)

**प्रश्न १३)** विशेषण - टवटवीत (गुण १)

टवटवीत हा शब्द येणारे अर्थपूर्ण वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा. (गुण १)

**प्रश्न १४)** वर्तमानकाळ - आई पत्र लिहिते/लिहित आहे. (गुण १)

भविष्यकाळ - आई पत्र लिहिल/लिहिणार आहे. (गुण १)

**प्रश्न १५)** **अ)** विश्वासला चांगले गुण मिळाल्याने सर्वांनी त्याला पुढील शिक्षण घेण्यासाठी **उत्तेजन दिले.** (गुण १)

**ब)** चंदूने झाडांना पाणी **घातले.** (गुण १)



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

## संच : अ

**प्रश्न १६) खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही.** (गुण ५)

पाऊस, गाय, डोंगर, दूध

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा केवळ शब्दलेखन. |
| १ | शब्दांची नुसती सुटी सुटी वाक्ये लिहिलेली आहेत. वाक्यात सलगता नाही. |
| २ | दिलेल्या शब्दांवरून संदर्भ घेऊन सलग लेखन, काही वेळा वाक्यरचना विस्कळित असू शकेल, गोष्ट नाही, त्रोटक लेखन. |
| ३ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| ४ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. |
| ५ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. गोष्ट खुलवण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका/ संवाद दिलेले आहेत. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

# संच : अ

**प्रश्न १७) 'किशोर' या मासिकाच्या दिवाळी अंकासाठी 'मुलांच्या नजरेतून' या सदरामध्ये मुलांनी केलेले लेखन छापणार आहेत. त्यासाठी पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर लिही.** (गुण ५)

१) दुष्काळ २) मुंगी ३) फळा

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या विषयांचा विचार न करता केलेले असंबद्ध लिखाण |
| १ | दिलेल्या विषयांपैकी एका विषयाचा विचार करून सुट्या सुट्या वाक्यांचे लेखन. |
| २ | निवडलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन लेखन केले आहे; पण<br>• वाक्यरचना नीट नाही.<br>• मर्यादित कल्पना मांडलेल्या आहेत.<br>• लेखामध्ये मांडलेल्या कल्पनांचा एकमेकांशी संदर्भ लावलेला नाही. |
| ३ | निवडलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• वाचकाला विषयाची नीटशी कल्पना येण्यासाठी पुरेसे मुद्दे मांडलेले आहेत.<br>• मांडलेल्या कल्पनांचा एकमेकांशी संदर्भ लावलेला आहे.<br>• कल्पनांचा/तपशिलाचा विस्तार केलेला नाही किंवा खूपच थोड्या प्रमाणात केला आहे. |
| ४ | • मांडलेल्या मुद्द्यातून विषयाची परिपूर्ण कल्पना येते.<br>• मुद्द्यांशी संबंधित उदाहरणे, स्पष्टीकरणे आढळू शकतात. पण ही कमी/मर्यादित स्वरूपाची असू शकतात.<br>• लेखाची मांडणी सुसंगत आहे. पण एक-दोन ठिकाणी लेखन मुदद्यापासून भरकटते.<br>• वाक्यरचना नीट आणि वाक्यांचा पल्लाही वाढलेला आढळतो. |
| ५ | • मांडलेल्या मुद्द्यांतून विषयाची परिपूर्ण कल्पना येते.<br>• मुद्द्यांशी संबंधित उदाहरणे देऊन, स्पष्टीकरणातून लेखनाचा विस्तार केलेला आहे.<br>• लेखाची मांडणी सुसंगत व ओघवती आहे.<br>• मुलाच्या लेखावरील भावना सुस्पष्ट आहेत. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

**संच : अ**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :**

मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी तुला काही प्रश्न विचारणार आहे, त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

**तिचा स्वभाव तसा चंचलच होता. म्हणून पेशवे तिला लाडाने ‘छबिली’ असं म्हणायचे.**

**कुठेही जायचं असलं तरी तिघं बरोबर असायचे. फिरायला जाताना, खेळताना, कुठेही त्यांचे त्रिकूट असायचे.**

**नानासाहेब आणि रावसाहेब यांच्याबरोबर मनूचेही शिक्षण सुरू झाले.**

**मनू मुळातच हुशार होती. त्यामुळे तिला काहीही शिकवले तरी ती पटकन शिकायची. मनू युद्धकलेचेही शिक्षण शिकली. लिहिणे-वाचणे, याबरोबर तलवार चालवणे, घोडदौड, धनुष्यबाण चालवणे, भालाफेक वगैरे सगळ्या गोष्टी मनू पटकन शिकली.**

**त्या काळात स्त्रियांना असले शिक्षण कधीच दिले जात नसे. त्यामुळे मनूचे सगळ्यांना कौतुक वाटत असे.**



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

## संच : अ

**वाचनासाठीचे गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन, वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही. वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

**गुण योग्य उत्तर**

**तोंडी प्रश्न २) मनूला पेशवे लाडाने कोणत्या नावाने हाक मारत असत?** (१) (ब)

अ) छकुली

ब) छबिली

क) छुटकी

**तोंडी प्रश्न ३) मनू कोणकोणत्या गोष्टी शिकली?** (२)

(युद्धकला, लिहिणे-वाचणे, तलवार चालवणे,
घोडदौड, धनुष्यबाण चालवणे, भालाफेक)

**तोंडी प्रश्न ४) त्रिकूटामध्ये कोणाकोणाचा समावेश असायचा?** (२)

(नानासाहेब, रावसाहेब आणि मनू)

■■■



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*